भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CF 349586

05 JAN 2024

अनु.क्र. 54748
मु.शु.रकम 500
दस्ताचा प्रकार PMRDA
दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय/नाही.
मिळकतीचे वर्णन
मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव व पत्ता Indition Enterprises Pvt ltd. Urawade, Pune - 412115
दुसऱ्या पक्षकाराचे नाव
हस्ते असल्यास त्यांचे नाव व पत्ता Adv Rohan Dedge Nanded phat Pune - 411041
बाळासाहेब मारुती गायकवाड
परवाना क्र. २२०११५६
नन्हे, सिंहगड रोड पुणे-४१ मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

वरिष्ठ कोषागार अधिकारी पुणे
05 JAN 2024
प्रथम मुद्रांक लिपीक कोषागार पुणे भारेला

NOTARY
PRAKASH MARUTI DAMBRE, PUNE
REGD.NO. 10348
EXPIRY DATE: 30/09/2028
GOVERNMENT OF INDIA

## हमीपत्र

आम्ही, सौ.अमृता आशुतोष वडणगेकर,वय – ४४ वर्षे,श्री. आशुतोष अनिलकुमार वडणगेकर, वय – ४७ वर्ष,राहणार – डी-१२, समर्थनगर,सिंहगड रोड, नऱ्हे-नवले ब्रिज,वडगाव बुद्रुक,पुणे – ४११०४१.व मे. ईडीट्रोन एन्टरप्राइझेस प्रायवेट लिमिटेड तर्फे श्री. रामकृष्णा मित्रा, वय-५० वर्षे,राहणार –उरवडे ,तालुका .-मुळशी ,जिल्हा.- पुणे. हमीपत्र देतो कि,




NOTARY PRAKASH MARUTI DAMBRE, PUNE REGD.NO.10348 EXPIRY DATE: 30/09/2028 GOVERNMENT OF INDIA

मौजे – उरवडे, येथील गट नं. ४०६ पैकी , तालुका – मुळशी , जिल्हा-पुणे, येथे सौ. अमृता आशुतोष वडणगेकर व आशुतोष अनिलकुमार वडणगेकर यांचे क्षेत्र – ११००.०० चौ.मी आणि श्री. रामकृष्णा मित्रा यांचे क्षेत्र – २५५०.०० चौ.मी यांसी एकूण क्षेत्र- ३६५०.०० चौ. मी. या मिळकतीमध्ये निवासी/बिगर निवासी पद्धतीचा प्लॉटचे बांधकामाबाबत प्रस्ताव जागामालक /कुलमुखत्त्यारपत्रधारक म्हणून मी दाखल केला आहे. तूर्त या जागी **पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे /ग्रामपंचायत** कडून पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकत नाही. याची माहिती मला देण्यात आली असून आला पर्याय म्हणून जागेवरील बोअरद्वारा पाणी उपलब्ध करून देण्याची किंवा टंकरद्वारा पाणी मिळण्याची व्यवस्था करीत आहोत. व त्यासबंधी आवश्यक त्या वरिष्ठ भूवैद्यानिक अधिकारी, भूजल सर्वेक्षण आणि विकास योजना या कार्यालयामार्फत किंवा तत्सम तांत्रिक सल्लागारामार्फत सदर पाणी असल्यावद्दल प्रमाणपत्र आणून देणेची कार्यवाही करणे माझेवर बंधनकारक राहील.

२) इमारत पूर्ण झाल्यावर इमारतीमधील निवासी / बिगर निवासी वापरासाठी **पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत** पिण्यासाठीपुरेसा पाणीपुरवठा पुरेशा दाबाने करू शकत नसल्यास पाण्याची पर्यायी व्यवस्था प्रवर्तक या नात्याने इमारतीनमधील रहिवाशांना मी करून देण्यास तयार असून त्याची सर्व जवाबदारी मी / आम्ही या हमिपात्राद्वारे स्वीकारत आहे.

३) **पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत** मार्फत कोणताही पाणीपुरवठा सुरु न जाल्यास किंवा अपुरा जाल्यास मी कोणत्याही कोर्टाकडे या बावतीत दावा दाखल करणार नाही.

४) निवासी अगर व्यापारी गाळयाचे विक्रीचे बुकिंग करतांना येणाऱ्या करारनाम्यामध्ये पाणी पुरवठ्याची वरीलप्रमाणे सर्व वस्तुस्थिती विशेष वाव म्हणून नमूद करून घेण्याची जवाबदारी राहील. जागेवरील परिस्थितीची जाणीव नियोजित गाळेधारकांना करून दिल्यानंतर सुद्धा या ठीकाणी होणाऱ्या बुंकिंग नंतर होणाऱ्या नियोजित गाळेधारकांना पाणी पुरवठा अपुरा झाला तर **पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत** चा पुरेसा पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत माझ्या / आमच्या खर्चाने पुरेसा पाणी पुरवठा करून देण्याची माझी जवाबदारी राहील. **पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत** ला तोशिष लागू देणार नाही.

५) टंकरद्वारा किंवा वोअरद्वारा सध्या मिळणाऱ्या पाण्याचे नमुने वेळोवेळी प्रयोगशाळेतून तपासून आणणे व त्या रिपोर्टनुसार पाणी वापरण्यात येईल, याची मी काळजी घेईन.

६) सदरची योजना संपूर्णरीत्या प्रवत्रक / मालक या नात्याने मी / आम्ही अन्य कोणास भविष्य काळात विकल्यास नवीन मालक / प्रवर्तकास या हमिपात्रातील सर्व बाबींची लेखी कल्पना देईन त्याचा समावेश नवीन करारनाम्यात करण्यात येईन / घेऊ .

७) हे हमीपत्र माझे वडीलवारसांवर बंधनकारक राहील.

८) सदर प्लॉटमधील संदर्भातील कोणत्याही होणाऱ्या करारामध्ये या हमीपत्राचा समावेश करण्यात येईल व हे हमीपत्र करारनाम्यातील विशेष वाव म्हणून समजण्यात येईल.

वरील हमीपत्र मी राजीखुशीने दि. ०६/०१/२०२४ रोजी लिहून दिले आहे.

पुणे
दिनांक: ०६/०१/२०२४



(हमीपत्र लिहून देणार)

**सौ. अमृता आशुतोष वडणगेकर**



श्री. आशुतोष अनिलकुमार वडणगेकर

Ashutosh.A.V.

मे. ईंडीट्रोन इंटरप्राईजेस प्रायवेट लिमिटेड तर्फे

श्री. रामकृष्णा मित्रा.



NOTED AND REGISTERED AT
SERIAL NUMBER 05
2024

06 JAN 2024

BEFORE ME

PRAKASH M. DAMBRE
NOTARY, GOVT. OF INDIA
PUNE.